दूरध्वनी : २५३३ १२११
२५३३ १५९०

# ठाणे महानगरपालिका , ठाणे.

महापालिका भवन , सरसेनानी जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग , चंदनवाडी , पांचपाखाडी, ठाणे - ४००६०२
THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE

## ठाणे शहरातील काही भागात होणार कमी दाबाने पाणी पुरवठा

ठाणे(5):ठाणे महापालिका क्षेत्रातील सिद्धेश्वर तलाव परिसरातील एका टाकीच्या डाऊनटेक पाईप दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेण्यात आल्यामुळे आज दिनांक ५ सप्टेंबर २०१८ पासून पुढील दहा दिवस ठाणे शहरातील काही भागात कमी दाबाने पाणी पुरवठा होणार आहे.

पाईप लाईन दुरुस्तीच्या कामामुळे कोलबाड,खोपट,गोकुळदासवाडी गोकुळनगर, बाटा कंपाऊंड, फ्लावर व्हॅली, सर्व्हिस रस्ता,विकास कॉम्पलेक्स, शेलारपाडा, धोबीआळी, सिद्धेश्वर तलाव, चरई व रमाईनगर या परिसराला कमी दाबाने पाणी पुरवठा होणार आहे.

पुढील दहा दिवस कमी दाबाने पाणी पुरवठा होणार असून, नागरिकांनी पाण्याचा योग्यतो वापर करुन पालिकेस सहकार्य करावे असे आवाहन पाणी पुरवठा विभागाने केले आहे.